सं. फौ. खटला क्र.३९/२०२०

सरकार विरुध्द महादेव

**निशाणी क्र.२९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नाव – बजरंग तुकाराम जाधव,

वय – ४३ वर्षे धंदा – मजुरी,

रा.तळेगाव, ता.अहमदपूर, जि.लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एन. ए. भांगे.**

**०१.** मी आरोपीस ओळखत नाही. मी फिर्यादी यांना उचलून गाडीमाध्ये टाकले त्यामुळे त्यांना मी ओळखतो. घटना सन २०१९ मध्ये संध्याकाळी साधारण ५.३० वाजता घडली होती. घटनेच्यावेळी मी सावरकर चौक, अहमदपूर येथे थांबलो होतो. माझ्यासोबत इसम नामे वसंत कांबळे हे होते. एक मोटारसायकल सावरकर चौकातील खंडाळी पॉईंटला क्रॉस करून जात होती. त्यावेळी एक रुग्णवाहिका विरूध्द बाजूने आली व तिने मोटारसायकलला धडक दिली. मोटारसायकवरील इसमास पायाला जोराचा मार लागला. आम्ही त्यास सरकारी दवाखाना, अहमदपूर येथे घेऊन गेलो. तिथे त्याचे नातेवाईक आले. ज्या रुग्णवाहिकेने धडक दिली होती त्यातूनच आम्ही जखमीस दवाखान्यात नेले. जखमीस पुढील उपचारासाठी लातूर येथे पाठवण्यात आले तेव्हा रुग्णवाहिकेचा चालक निघुन गेला. रुग्णवाहिका बसस्टँडकडून आली होती. मोटारसायकल चालक गिरबीडे यांच्या दवाखान्यापासून मुख्य रस्त्याला येत होता. रुग्णवाहिका चालक विरूध्द बाजूने आल्याने घटनेत त्याची चुक होती. पोलीसांनी माझ्याकडे विचारपुस केली होती.

**०२.** पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता बोलवले नव्हते. पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो पोलीसांनी माझ्यासमक्ष लिहीला होता. त्यावर माझी सही आहे. पंचनाम्यावेळी माझ्यासोबत वसंत कांबळे हे होते. पंचनाम्याची

तारीख मी सांगू शकत नाही. पंचनामा सावरकर चौक अहमदपूर येथे केला होता. पंचनाम्यास **निशाणी क्र.३०** देण्यात येते.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. डी. जाधव.**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, सावरकर चौक, तहसिल कार्यालय व पंचायत समिती जवळ जवळ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सावरकर चौकात रस्त्याच्या दोन्ही बाजुने दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे तिथे लोकांची सतत गर्दी व वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, तिथे वर्दळ असल्याने तिथून जाणाऱ्या वाहनांचा वेग कमी असतो. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी, मी व वसंत सोनकांबळे खंडाळी गावचे आहोत. हे म्हणणे खरे नाही की, रुग्णवाहिकेने मोटारसायकलला धडक दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अपघात पाहिला व जखमीला दवाखान्यात नेल्याचे खोटे सांगत आहे. घटनेची निश्चीत तारीख मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी व वसंत सोनकांबळे यांनी अपघात विमा मिळण्यासाठी खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा पोलीस स्टेशनला केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा माझ्यासमक्ष केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**फेर तपास** काही नाही.

श्रृवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.06.19 17:56:33 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक – १९.०६.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.

न्या.द.प्र.वर्ग.